मकर संक्रांति निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!

–संपादक

www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११० • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१५ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.




# काँग्रेसचे माजी खासदार मिलिंद देवरांचा शिवसेनेत प्रवेश

## मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत हाती घेतला धनुष्यबाण

**मुंबई**–काँग्रेसचे माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद मुरली देवरा यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यानंतर शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी धनुष्यबाण हाती घेतला आहे.राहुल गांधी यांनी पुन्हा पक्षाध्यक्ष करण्यास विरोध करणाऱ्या 'जी २३' गटाचे सदस्य असलेले काँग्रेसचे माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद मुरली देवरा यांनी अखेरीला काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आहे. स्वतः मिलिंद देवरा यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. कालपासून मिलिंद देवरा हे शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्यादोनदा खासदार व नंतर दक्षिण मुंबईतून दोनदा पराभूत झालेले देवरा यंदाही याच जागेसाठी आग्रही आहेत. मात्र १० वर्षांपासूनचे उद्धवसेनेचे विद्यमान खासदार अरविंद सावंत ही जागा सोडणार नाहीत. त्यामुळे महाविकास आघाडीत वाद निर्माण झाला आहे. याच कारणावरून देवरा यांनी शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. देवरा यांचा ओढा भाजपकडे होता. पण महायुतीत हा मतदारसंघ शिवसेनेकडे आहे. त्यामुळे भाजपच्या सल्ल्यानुसारच देवरा यांनी शिंदेसेनेचा 'पर्याय' स्वीकारल्याचे सांगितले जाते.रविवारी सकाळी मिलिंद देवरा यांनी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याचे ट्विट केले आहे. यामध्ये ते म्हणाले की, ''आज माझ्या राजकीय प्रवासातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा समारोप होत आहे. काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा मी राजीनामा दिला आहे. माझ्या कुटुंबाचे पक्षाशी असलेले ५५ वर्षांचे नाते संपवत आहे. मी सर्व नेते, सहकारी आणि कार्यकर्ते यांनी अखंड पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचा आभारी आहे'', असे ट्विट देवरा यांनी केले आहे.गरवारे क्लब आणि मुंबई काँग्रेस कार्यालयात शुक्रवारी काँग्रेस पदाधिकार्यांच्या बैठका होत्या. या दोन्ही बैठकांकडे देवरा यांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले. बैठकीला उपस्थित राहण्याबाबत अनेक नेत्यांनी त्यांच्याशी संपर्क साधला, विनंतीही केली होती. मात्र, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. देवरा यांनी पक्षीय सीमोल्लंघन करावे, यासाठी एका वजनदार उद्यागपतीने त्यांची मनधरणी केल्याची माहिती आहे. होती. शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर देवरा यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.मिलिंद देवरा हे माजी मंत्री आणि माझी खासदार राहिलेले आहेत. दक्षिण मुंबईमध्ये गुजराती, मारवाडी, जैन समाज आहे, तो मोठ्या प्रमाणात मिलिंद देवरा यांच्या संपर्कात आहे. तसेच, देवरांनी सातत्याने तिथे काम केलेले आहे, एक मेट्रो पॉलिटिकल चेहरा म्हणून मिलिंद देवरा यांच्याकडे पाहिले जाते. दक्षिण मुंबईतील उच्चभ्रू वस्त्यांमध्ये त्यांचे नावदेखील आहे. कुलाबा, वरळी, लालबाग, परळ या भागांत त्यांनी मोठे काम केले आहे. अशातच महायुतीलाही एका चेहऱ्याची गरज आहे. त्यामुळे महायुतीतील घटक पक्ष मिलिंद देवरांकडे एक पर्याय म्हणून पाहात असल्याची माहिती मिळत आहे.



# मूल–पोंभुर्णा तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांचे निराकरण करू–आ.प्रतिभा धानोरकर

## नवनियुक्त महाराष्ट्र काँग्रेस ओबीसी विभाग प्रदेश उपाध्यक्ष विनोद अहिरकर यांचा सत्कार समारंभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांनी मूल–पोंभुर्णा तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांचा निराकरण करण्याचा विश्वास व्यक्त केला. दि. १२ जानेवारी रोजी, नांदगाव (घोसरी)येथे विनोद अहिरकर यांचा महाराष्ट्र काँग्रेस ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड झाल्यानिमित्त सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या, मूल–पोंभुर्णा तालुक्यातील जे प्रलंबित प्रश्न असतील, ते मी सर्वप्रथम शासनाच्या निदर्शनास आणून देईन. त्यानंतर, त्या प्रश्नांचा निराकरण करण्यासाठी मी माझी सर्वतोपरी मदत करेन. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत प्रत्येक लोकांपर्यंत जाऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करत असताना, त्यांना कुठेही गरज लागली, तर त्यांची



एक मोठी बहीण म्हणून मी कायम त्यांच्यासोबत आहे.

या सत्कार समारंभाला महाराष्ट्र प्रदेश महासचिव विनोद दत्तात्रय, बल्लारपूर नगर परिषद माजी नगराध्यक्ष घनश्याम मूलचंदानी, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष सोहेल रजा शेख, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष तथा सभापती बाजार समिति पोंभुर्णा रवि मरपल्लीवार, वैशाली पुल्लावार, तसेच मुल व पोंभुर्णा तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली.यावेळी आमदार धानोरकर यांनी, राज्यातील सध्याच्या परिस्थितीबद्दलही आपण सर्वांनी चिंता व्यक्त केली पाहिजे. दोन वर्षांच्या कोविड काळात अनेक लोकांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव मिळत नाही. केंद्र सरकार आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत आहेत. भाजपाची सत्ता आली तेव्हापासून देश मागे जात आहे. संपूर्ण लोकसभा मतदारसंघ हा पोरका झालेला नाही. साहेब जरी गेले असले तरी त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी दिलेला प्रत्येक शब्द, त्यांनी बोललेल्या प्रत्येक गोष्टी या सात महिन्याचा कार्यकाळात मी पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. या भागात सुद्धा कामाच्या संदर्भात कुठला विषय असेल तर आपण नक्की माझ्यापर्यंत या. चंद्रपूरला सुद्धा आमचे जनसंपर्क कार्यालय आहे. तिथपर्यंत माझ्या माध्यमातून जेवढ्या कामाचा पाठपुरावा करता येईल, तेवढे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन, असेही आमदार धानोरकर यांनी आश्वासन दिले.

# पातागुडम पोलिसांनी केले क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



**सिरोंचा । प्रतिनिधी**

राज्याच्या शेवटच्या टोकावर व छत्तीसगड सीमेवरील पातागुडम उपपोलिस स्टेशन तर्फे भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार (१२ जानेवारी) रोजी येथील सरपंच सुजाता येलम यांच्याहस्ते करण्यात आला.यावेळी येथील प्रभारी अधिकारी ऋषिकेश तळेकर,पोलिस उपनरीक्षक अभिजित तुतुरवाड,पोलिस उपनरीक्षक मंगेश कोठावळे, सीआरपीएफ व एसआरपीएफ चे अधिकारी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.पातागुडम हे अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भाग असून छतीसागड सीमेवर वसले आहे.या भागात युवा खेळाडू मोठ्या संख्येने असून त्यांच्यातील क्रीडा कौशल्यांना वाव देण्यासाठी पोलिसांनी भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे.विशेष म्हणजे गडचिरोली पोलीस दलातर्फे विविध उपक्रम राबविले जातात.त्याचाच एक भाग म्हणून दुर्गम भागातही पोलिसांनी पुढाकार घेऊन या स्पर्धेचे आयोजन केल्याचे येथील अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.या स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिक ठेवल्याने परिसरातील खेळाडूंनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे.एवढेच नव्हेतर लगतच्या छत्तीसगड राज्यातून मोठ्या संख्येने चमू उपस्थित झाले आहे.सदर स्पर्धेच्या तयारीसाठी पोलिस अमलदरांनी परिश्रम घेतले.

## राज्यभरातील आदिवासींना आता शहरी भागातही मिळणार घरकुल

# वने व सांस्कृतिक कार्य मंत्री मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदिवासी उपयोजनेंतर्गत अनुसूचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांसाठी राज्य शासनाच्या वतीने शबरी आवास घरकुल योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ केवळ ग्रामीण भागातील आदिवासींना मिळत असल्याने शहरी भागातील आदिवासी घरकुलापासून वंचित होते. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास ही बाब आल्यावर त्यांनी शहरी भागातील आदिवासींनाही हक्काचे घरकुल मिळावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून आता शहरी भागात वास्तव्यास असलेल्या राज्यभरातील आदिवासी कुटुंबानाही या घरकुल योजनेचा लाभ मिळणार आहे. राज्यातील अनुसूचित जमातीच्या ज्या लोकांना राहण्यासाठी स्वत:ची घरे नाहीत अथवा जे अनुसूचित जमातीचे लोक कुडा मातीच्या घरात, झोपड्यांमध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या निवारात राहतात, अशा अनुसूचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी वैयक्तिक लाभाची शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्यात येते. ही योजना शासन निर्णयानुसार ग्रामीण व शहरी या दोन्ही भागात राबविणे अपेक्षित होते. मात्र ग्रामविकास विभागाच्या १० फेब्रुवारी २०१६ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष (ग्रामीण गृहनिर्माण) स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाद्वारे ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व राज्य शासनाच्या विभागामार्फत राबविण्यात येणा–या सर्व ग्रामीण घरकुल कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते. त्यामुळे शहरी भागात शबरी आदिवासी घरकुल योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा नसल्याने शहरी भागातील आदिवासी कुटुंब घरकुलापासून वंचित राहात आहे. ही बाब ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आल्यावर शहरी भागात संबंधित महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत यांच्यामार्फत आदिवासी कुटुंबासाठी शबरी घरकुल योजना राबवावी, यासाठी ना.मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच नगर विकास विभागाला आदिवासी विकास विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दिल्या. अखेर या प्रस्तावास नगर विकास विभागाने सहमती दर्शवली असल्याने आता शहरी भागातील पात्र आदिवासी लाभार्थ्यांना शबरी घरकुल योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबत ११ जानेवारी २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

**शबरी आदिवासी घरकुल योजना लाभार्थी पात्रता :**

लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा, त्याचे स्वत:च्या नावे पक्के घर नसावे, महाराष्ट्र राज्याचा १५ वर्षांपासून रहिवासी असावा, घराचे बांधकाम करण्यासाठी स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जमीन असावी, यापुर्वी कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, वय पूर्ण १८ वर्षे असावे, स्वत:च्या नावे बँक खाते असावे.

**अनुदान रक्कम :**

या योजनेंतर्गत घरकुल बांधकामाचे चटई क्षेत्र २६९ चौरस फूट असून घरकुल बांधकामासाठी अनुदान रक्कम ही २ लक्ष ५० हजार राहील. सदर अनुदान रक्कम ही चार टप्प्यात लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल. यात घरकुल मंजूरी मिळाल्यानंतर ४० हजार रुपये, प्लिंथ लेवल ८० हजार, लिंटल लेवल ८० हजार आणि घरकुल पूर्ण झाल्यानंतर ५० हजार असे एकूण २ लक्ष ५० हजार रुपये अनुदान आहे.

**आवश्यक कागदपत्रे :**

अर्जदाराचे नजीकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो, रहिवासी प्रमाणपत्र, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र, घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध आहे किंवा नाही, यासाठी पुरावा, उत्पन्नाचा दाखला (तहसीलदार यांचा), शिधापत्रिका, आधारकार्ड, एक रद्द केलेला धनादेश अथवा बँकेच्या पासबुकच्या पहिला पानाची छायांकित प्रत (फोटो व खाते क्रमांक असलेली)

# युवकांनी स्वामी विवेकानंद यांची प्रेरणा घ्यावी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम

## शांतिग्राम येथे भव्य खुले कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

**मूलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील स्वामी विवेकानंद फॉउडेशन,शांतिग्राम यांच्या सौजन्याने भव्य खुले कबड्डी स्पर्धेचे आयोजन शांतिग्राम येथील ग्रामपंचायत पटांगणात करण्यात आले होते.यावेळी भव्य खुले कबड्डी स्पर्धेचे उद्घाटक म्हणून माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे होते.उद्घाटन प्रसंगी बोलतांना ते म्हणाले १२ जानेवारी स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिवस म्हणून संपूर्ण देशात व जगात साजरी केली जाते. स्वामी विवेकानंद यांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक कार्यासाठी समर्पित केले.त्यांनी केलेली कामे ही युवकांसाठी प्रेरणा देणारी आहेत.आजच्या युवकांनी त्यांची प्रेरणा घ्यावी असे मत यावेळी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी व्यक्त केले.यावेळी मोठ्या संख्येने स्पर्धकांनी भव्य खुले कब्बड्डी



सामन्याला हजेरी लावली होती.

भव्य कबड्डी स्पर्धेसाठी प्रथम पुरस्कार ३० हजार एक रुपये पुरस्कार माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या कडून तर द्वितीय पुरस्कार २० हजार एक रुपये माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रशांत कुत्तरमारे यांच्या तर्फे देण्यात आले आणि तृतीय पुरस्कार १० हजार एक रुपये माजी समाजकल्याण सभापती माधुरी संतोष उरेते यांच्या कडून देण्यात आला आहे.तसेच यावेळी स्वामी विवेकानंद फॉउडेशन तर्फे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या हस्ते स्थानिक मंदिराला पूजा साहित्य आणि खेळाडूला स्पोर्ट ड्रेस देण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रशांत कुत्तरमारे,प्रमुख अतिथी म्हणून शांतिग्राम सरपंच अर्चना बैरागी,माजी उपसभापती बासू मुजुमदार, सामाजिक कार्यकर्ते संतोषभाऊ उरेते,भाजपा तालुका अध्यक्ष संजीव सरकार,भाजप महामंत्री विजय बिश्वास,सौरव पोद्दार,आशिष पोद्दार,निपुण शील,वैष्णव ठाकूर,निर्मल मंडल,नितेश पोद्दार,समर सरकार,कर्णधार मंडल,महेश तरफदार हे उपस्थित होते.

# पतंग खेळा पण सांभाळून...

**संक्रांत सणाच्या निमित्ताने पतंगबाजीचा खेळ सर्वत्र सुरू दिसतो. आकाशात उंचच उंच उडणाऱ्या रंगीबेरंगी पतंगा पाहून अनेकदा आनंद होतो. परंतु आपला हा आनंद कोणाच्या जीवावर उठणार नाही यासाठी पतंगबाजांनी थोडीशी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. विजयाच्या खोट्या आमिषाला बळी न पडता नायलॉन मांजा ऐवजी साध्या धाग्याचा वापर करून पतंगबाजी करणे कधीही श्रेयस्कर होईल. आपल्या आनंदासोबतच आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांच्या जीविताचे रक्षण करणे आणि रस्त्यावरून चालणाऱ्या माणसांच्या गळ्याचे रक्षण करणे हेही आपले कर्तव्य आहे.**






नायलॉन धाग्याच्या वापरामुळे गळ्यात हा धागा लटकून अनेकदा नागरिकांना आणि पक्षांना जीव धोक्यामध्ये घालावा लागतो. गळ्याला लागणाऱ्या धाग्यामुळे होणाऱ्या घटनांवर प्रतिबंध करण्यासाठी या धाग्याच्या वापरावर बंदी आणणारा कायदा कठोरपणे अमलांत आला पाहिजे. त्यासोबतच समाजामध्ये जनजागृती झाली पाहिजे. कोणाच्या जीवावर संक्रांत येणार नाही यासाठी नायलॉन धाग्याचा वापर मी करणार नाही तसेच कोणी आढळल्यास त्याला समजावून सांगेल अशी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. धाग्यांची निर्मिती दोन प्रकारची असते. एक नैसर्गिकरित्या तयार होणारा धागा. आणि दुसरा कृत्रिम पद्धतीने तयार केला जाणारा धागा. नैसर्गिक पद्धतीने तयार होणाऱ्या धाग्यामध्ये कापसापासून तयार होणाऱ्या धाग्याचा उल्लेख करता येईल. या धाग्यांचे आयुर्मान ठरलेले असते. ते कुजून कालांतराने आपोआप नष्ट होतात. पूर्वीच्या काळी पतंग उडविण्यासाठी याच कापसापासून तयार झालेल्या धाग्याचा वापर केला जायचा. परंतु अलीकडे मागील दशकात पतंगबाजी करणारी पिढी कृतीम धाग्याकडे वळलेली आहे. अर्थात अलीकडे पतंगबाजी करण्यासाठी नॉयलॉनच्या मांजाचा उपयोग मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे लक्षात येत आहे. हा धागा कुजत नाही आणि सहजासहजी तुटतही नाही. हा धागा तयार करण्यासाठी नायलॉनच्या खालोखाल पॉलीअमाईड, पॉलीक्रीलोणायट्राईल, पॉलीव्हिनील क्लोराईड, कोपॉलीमर, पॉलीप्रोपोलीन, पॉलीव्हिनील अल्कोहोल अशा रसायनांचा वापर होत असल्याची माहिती अनधिकृतपणे कळते. काही प्रमाणामध्ये मच्छीमारीसाठी अशा प्रकारच्या धाग्याचा उपयोग होत असल्याची माहिती आहे. औद्योगिकदृष्ट्या विचार करता अशा प्रकारच्या जागेची निर्मिती करणारे छोटे मोठे कारखाने अनेक ठिकाणी असावे असे वाटते. यांच्यावर कागदोपत्री बंदी घातलेली असली तरी प्रत्यक्षात ती किती प्रभावी असेल हे पुरवठा होणाऱ्या मांजाच्या प्रमाणावरून लक्षात येते. आपल्या देशामध्येच पद्धती अशी आहे की, अनेकदा कायद्याने अनेकदा मनाई असते. परंतु प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा या भ्रष्टाचारी असल्याने व त्यात स्वार्थ आड येत असल्याने प्रत्यक्षात प्रामाणिक अंमलबजावणी होताना दिसत नाही.

संक्रांतीच्या सणामध्ये अनेकांना पतंग उडवण्याची इच्छा होते. आपलीच पतंग सर्वात उंच कशी जाईल आणि पेच लावल्यावर कशी जिंकेल या आनंदासाठी धावपळ सुरू असते. यासाठी लहानथोर माणसे मोठ्या प्रमाणामध्ये सहभागी होताना आपल्याला दिसतात. मात्र माणसाच्या या आनंदामध्ये प्राणी, पक्ष्यांवर संक्रांत येते. हे आपल्याला या काळात रस्त्यावर फिरताना रस्त्यावर पडलेले पक्षी पाखरं बघून सहज लक्षात येईल. आकाशामध्ये निरपेक्ष फिरणाऱ्या पक्षांच्या विहारावर यामुळे बंदी येते. त्यांचे गळे कापले जातात व अनेक अवयव कापून दुर्घटनाग्रस्त होतात. या संदर्भामध्ये अनेक पक्षीमित्र वारंवार त्यांच्या पध्दतीने आवाज उचलतात तरी या मुक्या जीवांचे कोणालाही काही वाटत नाही.

एखाद्या व्यक्तीजवळ माझा मिळाला की त्याला अटक करायची आणि तेवढ्यापुरता चौकशीचा फार्स उभा करायचा. सगळे हास्यास्पद आहे. खरोखरच जर ही समस्या मिटवायची असेल तर ज्या ठिकाणी हा धागा तयार होतो त्या कारखान्यावर बंदी आणायला पाहिजे. त्याचे उत्पादन कायमचेच कसे बंद करता येईल यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. तिथून माल विकणारे एजंट, विक्रेते आणि ग्राहक यांची एक वर्गवारी तयार करून हे रॅकेट मोडीत काढले पाहिजे. तसेच साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई झाली तर कदाचित ही माझ्याची समस्या निघून जाईल. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही.

पक्षांसोबतच आणखी धोक्यात येणारी जमात म्हणजे जेव्हा एखादा दूचाकीस्वार भरदाव वेगाने आपली गाडी चालवत जातो तेव्हा मांझा समोरून आल्यावर थेट त्याच्या गळ्यात जाऊन अडकतो आणि अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. त्याच्या परिवाराला पोरके व्हावे लागते. याची दखल कोण घेणार?

केवळ आपल्या आनंदासाठी असा खेळणाऱ्यांवर प्रशासनाने बंदी आणली पाहिजे. नैतिक कर्तव्य समजून समाजातील लोकांनीही त्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. मात्र याबाबतीत ज्या प्रमाणामध्ये स्थानिक एनजीओंकडून या संदर्भात जनजागृती करायला पाहिजे ती अल्प आहे. त्यामुळे ज्या प्रमाणात मांझाचा वापर करायला पाहिजे ते थांबत नाही.

साधारणतः किशोरवयीन मुले व महाविद्यालयीन मुले मोठ्या प्रमाणामध्ये पतंगबाजी करताना दिसतात. हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालया सारख्या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती घडून आणली तर कदाचित विद्यार्थ्यांना दुष्परिणाम समजतील आणि विद्यार्थी जागृत माझाचा वापर करणार नाही. शालेय व महाविद्यालयस्तरावर ज्या यंत्रणा आहे त्यांनी या संबंधात विशेष व्याख्याने व जाणीव जागृती कार्यक्रम हाती घ्यायला पाहिजे. शाळा महाविद्यालयांना लक्ष करून जर अशाप्रकारे जनजागृती करण्यात आली तर कदाचित मांजाचा वापर निश्चितपणे घटेल असा विश्वास वाटतो. महाविद्यालयस्तरावर राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग यासारखे विद्यार्थ्याभिमुख उपक्रम असतात. या उपक्रमांच्या माध्यमातून घराघरात मांझाबंदीची भूमिका पोहोचवता येईल व आकाशात उडणाऱ्या जीवांचे मोठ्याप्रमाणात रक्षण करता येईल. पर्यावरणाच्या संरक्षणामध्ये पक्षांची भूमिका फार महत्त्वाची आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.दुर्दैवाने आज या पक्षांच्या जीवावर संक्रांत येत आहे. पक्षांचा जीव वाचविणे हे आपल्या सगळ्यांचं आद्यकर्तव्ये आहे. त्याचप्रमाणे माझ्या नादानपणामुळे कुणाची मान कटणार नाही यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

## महाराणी ताराबाई विद्यालयांमध्ये

# राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सामूहिक महावाचन संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील शिक्षण क्षेत्रात नावलौकिक असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून शुक्रवार दि.१२जानेवारी २०२४ रोजी विद्यार्थ्यांचे सामूहिक महावाचन घेण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम तसेच प्रमुख वक्ते म्हणून चोले सर,चांदणे सर तर प्रमुख वक्त्या म्हणून श्रीमती दिव्य मॅडम उपस्थित होत्या.मान्यवरांच्या शुभहस्ते राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमांमध्ये कराडकर, लिंगसकर,खेत्रे,पाटेकर शेळके,गुरसाळी आदि



विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले तसेच चोले सर,चांदणे सर,श्रीमती दिव्या मॅडम जयंतीच्या अनुषंगाने यथोचित विचार व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप पर विचार व्यक्त करताना अशोक भैय्या आंधळे यांनी सांगितले की 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत सामूहिक महावाचन आपण केले विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी हाच या पाठीमागचा उद्देश आहे तसेच संस्कारीत व आदर्श समाज घडवण्यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची आज गरज आहे असे विचार व्यक्त करून सर्व विद्यार्थ्यांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अंडील जी.पी.यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार विद्यालयाचे पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृद्धांनी परिश्रम घेतले.

# मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्थ एस एम देशमुख यांचा पाथरीत सत्कार

**पाथरी । प्रतिनिधी**

पत्रकारांची मातृ संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्थ तथा पत्रकार हल्ला कृती समितीचे अध्यक्ष एस एम देशमुख हे माहुर येथे पत्रकार संघाच्या कार्यक्रमा साठी जात असतांना पाथरी पत्रकार संघाला धावती भेट दिली या वेळी मराठी पत्रकार संघ आणि डिजिटल मिडियाच्या वतीने स्वागताध्यक्ष मुंजाभाऊ नाना टाकळकर यांनी एस एम देशमुख आणि त्यांच्या सहका-यांचा शाल, पुष्पहार,गुच्छ देऊन सत्कार केला.

शासकीय विश्राम गृह पाथरी येथे शुक्रवार १२ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता झालेल्या या सत्कार कार्यक्रम प्रसंगी एस एम देशमुख यांच्या सोबत मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडियाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, बीड जिल्हाध्यक्ष सतिष साळूंके, सुभाष नागलगावकर, दिलीप झाडे, हरीष यादव, सुधीर नागापुरे, रत्नाकर कुलथे आदी



उपस्थित होते. या वेळी या कार्यक्रमा साठी मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडियाचे परभणी ग्रामिण जिल्हाध्यक्ष किरण घुंबरे पाटील,पत्रकार संघाचे पाथरी तालुकाध्यक्ष धनंजय आडसकर,सल्लागार ॲड श्रिपाद कोंत,भास्करराव पंडीत,अयुब खान,अहेमद अन्सारी,विठ्ठल प्रधान, गणेश जत्ती,के डी कदम, उद्धवराव इंगळे,दत्तराव उपाडे यांची या वेळी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्र संचलन ॲड श्रिपाद कोंत यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष धनंजय आडसकर यांनी मानले.

# ज्ञानोपासक विद्यालयात जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी



**कौसडी । प्रतिनिधी**

सेलू तालुक्यातील कुपटा ज्ञानोपासक विद्यालय येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस उत्साहात संपन्न झाला. यावेळी विद्यालयातील अनेक विद्यार्थी जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेमध्ये उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. पी. तलवारे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षक सी. के. चरचरे , एस जी. शेख, एस. टी पाडाळसे, एस. पी. इंगळे, व्हि.बी पवार,उपस्थित होते, यावेळी विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त भाषणे केली . कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपीय भाषणात विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. पी. तलवारे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये ध्येय , चिकाटी व काटेकोरपणे नियोजन करून यश संपादन करण्यासाठी प्रयत्नशील असावे असे सांगितले. तसेच युवा दिनाविषयी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पी. एस. काठोळे, पी .एस अंभुरे, जे. पी. शिंदे, एस .एफ. पवार,आर .एम. राऊत,ए. यू. चट्टे, एस. ए .भोसले, आर .बी. घुगे,ए. आर. शिंदे, के. व्ही .भगस, एस. ए. पवार, शिक्षकेतर कर्मचारी, एल. बी. राऊत, एस .सी उप्पलवाड, जी. बी.गिरी. एस. आर. घोडके, इत्यादीनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले .

सूत्रसंचालन -पूजा रवंदळे

आभार- सांची दुधवडे हिने मानले.

## कौसडी येथे धार्मिक सलोख्याचे दर्शन

# मस्जिद परिचय उपक्रमातून हिंदू बांधवांच्या अनेक शंकांचे निरसन

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील आमेना मस्जिद येथे हिंदू बांधवांसाठी मस्जिद परिचय कार्यक्रम घेण्यात आला. कशा पद्धतीने धर्माचे आचरण आणि नमाज पठण करण्यात येते. त्यासाठी सुविधा व सोयीबद्दल विस्तृत अशी माहिती देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन आले होते.

यावेळी उपस्थित हिंदू समाजामध्ये मस्जिदीविषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे आयोजकांमार्फत सांगण्यात आले.

गावातील मस्जिद ए आमेना बस स्थानक या ठिकाणी मस्जिद परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमांतर्गत उपस्थित हिंदू समाजातील नागरिकांना मुस्लिम समाजाचे कुरान ए शरीफ आणि त्यांचे प्रेषित यांच्या बद्दल विस्तृत माहिती शकील अहमद, मोहम्मद मुसद्दीक यांच्याकडून सांगण्यात आली. नमाज पटनाची वास्तविकता काय आहे? ईश्वराचे आदेश काय आहेत आणि सर्व मानव जातीला कशा पद्धतीने वागणूक वर्तन आणि व्यवहार करवायचे असते तसेच मस्जिदीची जेवण कोणत्या पद्धतीची असते या मस्जिदीमध्ये धर्माविषयी आणि ईश्वर विषयी माहिती देण्याचे व भाईचाऱ्याने राहण्याचे संकेत कसे दिले जातात, मुस्लिम समाजाविषयी



असलेले गैरसमज कशा पद्धतीने वाढत आहे? मुस्लिम समाजात स्त्रियांना किती, कशा प्रकारचे स्थान आहे. व इतर समाजाविषयी मुस्लिम समाजामध्ये काय भावना असतात, याविषयी मार्गदर्शन केले. आज पर्यंत मुस्लिम समाजाविषयी ध्वनिक्षेपणावरून प्रार्थना विषय व ईश्वरबद्दल सांगण्यात येणाऱ्या संदेशाबाबत अनेक प्रकारचे गैरसमज निर्माण झाले आहेत. ते दूर करण्यासाठी वास्तविक रूपामध्ये मस्जिदित रोजच्या रोज कशाप्रकारे ईश्वराचे नामस्मरण केले जाते याविषयी सुद्धा धर्म अभ्यासकांनी सांगितले. मुस्लिम समाजा विषयी इतर समाजांमध्ये पसरत असलेला गैरसमज दूर करण्यासाठीच हा मुस्लिम समाजातर्फे करण्यात आलेला प्रयत्न अत्यंत स्तुत्य असा आहे, असे भावोद्गार यावेळी उपस्थित हिंदू धर्मातील नागरिकांकडून काढण्यात आले. असे कार्यक्रम पुन्हा पुन्हा व्हावेत, जेणेकरून सामाजिक तेढ निर्माण होणार नाही आणि अशा कार्यक्रमातून सर्व समाजातील दैव आणि ईश्वर बद्दल सविस्तर अशी माहिती सर्वांनाच ठाऊक होईल, असेही उपस्थितांमधून सांगण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील शेकडो हिंदू बांधवांनी उपस्थिती लावली होती. हे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मौलाना मस्जिद कमिटी सदस्य व मुस्लिम तरुण युवकांनी परिश्रम घेतले होते.

# मराठा समाजाला आरक्षण द्या पण ओबीसीतून नको-छगन भुजबळ



**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या अशी मागणी करत मनोज जरांगे पाटील गेल्या काही महिन्यांपासून आंदोलन करत आहेत. शिंदे-फडणवीस सरकारने त्यांची मागणी पूर्ण करण्याचं आश्वासन दिलं होतं. परंतु, राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देऊ शकलेलं नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे की, लाखो मराठा बांधवांना घेऊन आम्ही २० जानेवारी रोजी मुंबईत चक्काजाम आंदोलन करू, तसेच मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसेन. दुसऱ्या बाजूला, राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही, असं म्हटलं आहे. मराठा आरक्षणावरून जरांगे पाटील आणि छगन भुजबळ सातत्याने एकमेकांवर टीका-टिप्पणी करत आहेत. अशातच भुजबळ यांनी शनिवारी (१३ जानेवरी) बीड येथे ओबीसी एल्गार मेळावा घेऊन ओबीसींबाबत आक्रमक भूमिका मांडली.

ओबीसी एल्गार मेळाव्यात भुजबळ यांनी सर्वप्रथम मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देणाऱ्या नेत्यांना सुनावलं. भुजबळ म्हणाले, जे नेते याप्रकरणी शांत आहेत त्यांच्याविरोधात आम्ही काहीच बोलणार नाही. परंतु, जे आमच्याविरोधात त्यांना (मनोज जरांगे यांना) शक्ती देत आहेत त्यांना मात्र आम्ही कधीच विसरणार नाही. आगामी निवडणुकांमध्ये त्यांना त्यांची जागा दाखवून देऊ. सध्या जे काही चाललंय त्याची किंमत त्यांना मोजावीच लागेल. मला त्या सगळ्यांना सांगायचं आहे की, तुम्ही असं समजू नका केवळ तेच सगळं काही आहेत आणि आम्ही कोणीच नाही.

छगन भुजबळ म्हणाले, ते (मनोज जरांगे) राष्ट्रीय नेत्यांना सांगत आहेत की आमचा मोर्चा मुंबईत येणार आहे. आमच्या पाठिशी उभे राहा. ते नेतेही सांगतात, आम्ही तुमच्या पाठिशी आहोत. मला त्या नेत्यांना सांगायचं आहे. तुम्ही कोणाच्याही पाठिशी उभे राहा. मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्या. वेगळ्या आरक्षणाच्या मागणीसाठी तुम्ही मराठा समाजाच्या पाठिशी उभे राहणार असाल तर माझं काहीच म्हणणं नाही. याबाबतीत मीसुद्धा तुमच्याबरोबर आहे. परंतु, ते (मनोज जरांगे) म्हणतात ओबीसीतूनच आरक्षण घेणार. त्यांची अशी भूमिका असेल तर मला त्यांना सांगायचं आहे की, तुम्हाला आरक्षण मिळणार नाही, ओबीसीत मराठा सामाजाला आरक्षण मिळणार नाही.छगन भुजबळ म्हणाले, दंडुके काय पिस्तुलं काय मला त्यांना सांगायचं आहे, बेटा छोड दे यह हथियारों की बात, बेटा छोड दे यह हथियारों की बात, वरना सब मिट्टी में मिल जाय. तू हमसे क्या टकरायेगा, जो जो हमसे टकराये हैं, सब मिट्टीमे मिल जाय. क्या तुम हमसे टकराओगे? हथियारों की बात करता हैं

## महायुतीत पक्ष प्रवेशासाठी रांगा:येत्या काळात महाराष्ट्राला हादरे देणारे पक्ष प्रवेश दिसतील-चंद्रशेखर बावनकुळे

**पुणे-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पक्ष प्रवेशासाठी लोक रांगा लावून उभे आहेत. त्यामुळे येत्या काळात महाराष्ट्राला हादरे देणारे पक्ष प्रवेश दिसतील असा मोठा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. मिलिंद देवरा यांच्या राजीनाम्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी हे विधान केले. ते पुण्यात बोलत होते.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर मंदिर स्वछता अभियान राबविण्यात यावे असे आवाहन केले होते. त्यानुसार आज पुण्यातील शिवाजीनगर गावठाण येथील रोकडोबा मंदिरामध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते स्वछता अभियानास सुरुवात करण्यात आली. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशातील नागरिकांना मंदिरांची स्वच्छता करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार २२ जानेवारीपर्यंत हर मंदिर स्वच्छ अभियान हे सुरू राहणार आहे. हे अभियान देशव्यापी असून या अभियानाची सुरूवात आपल्या पुण्यामधून आज झाली आहे. या अभियानामध्ये सातत्य राहणार आहे. हे अभियान फोटो सेशनसाठी नसल्याचे देखील यावेळी त्यांनी सांगितले.यावेळी त्यांनी इंडिया आघाडीच्या समन्वयकाबाबत बोलताना ते म्हणाले,''नेहमी काँग्रेस पक्षाने देशातील हिंदू समाजाचा अपमान केला असे ते म्हणतात. पण अयोध्येत भव्य राम मंदिर उभारण्यात आले असून त्यासाठी काँग्रेससह सर्व पक्षांना निमंत्रण दिले. पण त्या निमंत्रणावर काँग्रेस पक्षाने बहिष्कार टाकला. हिंदू सनातन



धर्माविरोधात भूमिका मांडणे अशी भूमिका काँग्रेस आणि इंडिया आघाडी आहे. अशा आघाडीला कोण नेता मिळणार? त्यामुळे उद्धव ठाकरेंना मत देणे म्हणजे सनातन धर्म संपवल्यासारखे आहे'' असेही बावनकुळे म्हणाले.तसेच ते पुढे म्हणाले की, आज जर बाळासाहेब ठाकरे असते, तर ते अयोध्येत राम मंदिराच्या सोहोळ्यासाठी गेले असते. पण उद्धव ठाकरे हे आज ती भूमिका घेत नसून इटालियन शक्ति समोर त्यांना झुकावे लागत असल्याचे सांगत पुन्हा एकदा बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. आता उद्धव ठाकरे यांनी कितीही हिंदुत्वाच्या बाता मारल्या, तरी काँग्रेसच्या आणि इटालियन शक्तिच्या पायावर उद्धव ठाकरे हे लोटांगण घालत आहेत अशी टीका बावनकुळे यांनी केली.

## भारत जोडो न्याय यात्रेला अपशकून करण्याचा अयशस्वी प्रयत्न-थोरात

**मुंबई**-आमचे सहकारी मिलिंद देवरा यांनी काँग्रेस पक्ष सोडण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत दुर्देवी आहे. राजीनामा देण्यासाठी त्यांनी आज भारत जोडो न्याय यात्रेच्या शुभारंभाचा दिवस निवडून यात्रेला एकप्रकारे अपशकून करण्याच्या अयशस्वी प्रयत्न केला आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.बाळासाहेब थोरात पुढे बोलताना म्हणाले की, देशातील सर्वसामान्य, गोरगरीब, शोषीत, पीडित जनतेला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी ६ हजार ७०० किलोमीटरची यात्रा काढणा-या राहुलजी गांधी यांच्या मार्गात अडथळे आणण्याचा आपला हा प्रयत्न आपले वडील, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते स्वर्गीय मुरली देवरा यांना ही आवडला नसेल.लोकसभा निवडणूक जवळ आल्यानंतर राजकीय हालचाली आणि पक्षांतरे सुरू झाली आहेत. दोनवेळा दक्षिण मुंबई मतदारसंघाचं प्रतिनिधीत्व केलेले आणि मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून काम काँग्रेसचे नेते देवरा यांनीही वेगळा निर्णय घेतला आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेचा आजच दुसरा टप्पा सुरू होत आहे. त्यामुळे त्याच्या तयारीची धांदल आणि पक्षात उत्साहाचे वातावरण असतानाच देवरा यांच्या



या निर्णयामुळे पक्षाला मोठा धक्का बसला आहे.बाळासाहेब थोरात म्हणाले की, आमचे सहकारी मिलिंद देवरा यांनी काँग्रेस पक्ष सोडण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत दुर्देवी आहे. राजीनामा देण्यासाठी त्यांनी आज भारत जोडो न्याय यात्रेच्या शुभारंभाचा दिवस निवडून यात्रेला एकप्रकारे अपशकून करण्याच्या अयशस्वी प्रयत्न केला आहे. देशातील सर्वसामान्य, गोरगरीब, शोषीत, पीडित जनतेला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी ६ हजार ७०० किलोमीटरची यात्रा काढणा-या राहुलजी गांधी यांच्या मार्गात अडथळे आणण्याचा आपला हा प्रयत्न आपले वडील, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते स्वर्गीय मुरली देवरा यांना ही आवडला नसेल.

## विकासाचे मुद्दे नसल्याने भाजपला राम मंदिरावर निवडणूक लढवायची-रोहित पवार

**सोलापूर**-२२ तारखेच्या कार्यक्रमात धार्मिक कार्यक्रम कमी आणि राजकीय कार्यक्रम जास्त होत आहेत असा धर्मगुरूंचा आरोप आहे. मंदिर पूर्ण होण्याआधीच तो कार्यक्रम घेतला जातो त्यामुळे लोकांना राजकीय वास येत आहे. तसेच विकासाचे मुद्दे भाजपकडे राहिले नाहीत त्यामुळे राम मंदिरावर इलेक्शन लढायचे आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार पुढे बोलताना म्हणाले की, माझ्या संस्थेवर जेव्हा कारवाई झाली तेव्हा मी इथे नव्हतो. काही तज्ञ लोकांनी सांगितले की दहा दिवस येऊ नका मात्र तरीही मी इथे आलो. मराठी माणसं कोणाला घाबरत नाहीत आणि दिल्ली समोर कधीही झुकत नाहीत, माझी संघर्ष यात्रा झाल्यानंतर माझ्यावर कारवाई सुरू झाली,असे आरोपही रोहित पवार यांनी केले आहेत. तरआमदार रोहित पवार यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला चारही शंकराचार्यांनी



जाण्यास नकार दिल्याचे सांगत भाजपवर टीका केली. शंकराचार्यांना सर्व धार्मिक पद्धती माहिती असतात त्यामुळे त्यांनी २२ तारखेला तेथे जाण्यासाठी बहिष्कार टाकला असावा, असे रोहित पवार यावेळी म्हणाले.आमदार रोहित पवार म्हणाले की, २२ तारखेच्या कार्यक्रमात धार्मिक कार्यक्रम कमी आणि राजकीय कार्यक्रम जास्त होत आहेत असा धर्मगुरूंचा आरोप आहे. मंदिर पूर्ण होण्याआधीच तो कार्यक्रम घेतला जातो त्यामुळे लोकांना राजकीय वास येत आहे. तसेच विकासाचे मुद्दे भाजपकडे राहिले नाहीत त्यामुळे राम मंदिरावर इलेक्शन लढायचे आहे, अशी टीकाही रोहित पवार यांनी केली.

# बुलडाणा लोकसभेवर शिवसेनेचा भगवाच फडकणार

## मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे यांनी व्यक्त केला निर्धार



**बुलडाणा । प्रतिनिधी**

शिवसंकल्प अभियाना अंतर्गत शिवसेना पक्षाची मिशन ४८ ची लोकसभा जाहीर सभा आज बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे मुख्यमंत्री मा.एकनाथ जी शिंदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.या सभेला संबोधित करताना विरोधकांनी केलेल्या टीकेला जशास तसे प्रत्युत्तर दिले. बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील खामगांव- जालना रेल्वेमार्गासाठी ५० टक्के हिस्सा राज्य सरकार देईल, लोणार सरोवर संवर्धनासाठी ३६९ कोटी रुपये आणि पेनटाकळी जलसिंचन प्रकल्पाला ५०० कोटी दिले आहेत, तसेच वैनगंगा- पैनगंगा नदीजोड योजनेला मंजुरी दिली जाईल असेही मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांनी स्पष्ट केले. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार टिकावेत, धनुष्यबाण टिकावा यासाठी दीड वर्षांपूर्वी आम्ही वेगळा निर्णय घेतला. त्यामुळे आज अनेक शिवसैनिक आमच्या निर्णयाला पाठींबा देण्यासाठी सोबत येऊन जोडले जात आहेत. वंदनीय शिवसेनाप्रमुख हे कार्यकर्त्यांना आपले मानायचे, तुम्ही कार्यकर्ते आहात म्हणून मी शिवसेनाप्रमुख आहे असं त्यांचं मत होतं. मात्र आजचे नेते मी आहे म्हणून तुम्ही आहात या मानसिकतेतून वागत आहेत. त्यामुळेच घरंदाज माणसाने घराणेशाहीवर बोलावे असे म्हणून त्यांनी सर्वसामान्य, गोरगरीब शिवसैनिकांचा जाहीर अपमान केला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना तिलांजली देऊन काँग्रेसशी यांनी सख्य केलं, सर्वसामान्य शिवसैनिकांवर अन्याय झाला तेव्हा यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. शिवसैनिकांच्या व्यथा वेदना यांचं त्यांना काहीच वाटत नव्हते, उलट त्यांना कायम घरगड्यासारखी वागणूक यांनी दिली. अंगावर केसेस घेऊन, लाठ्या काठ्या झेलून पक्ष आम्ही शिवसैनिकांनी वाढवला त्यामुळे आमच्यावर टीका करताना तुम्ही पक्षासाठी नक्की काय केलं ते सांगा असे जाहीर आव्हान दिले. अयोध्येत राम मंदिर आणि काश्मीरमधील ३७० कलम रद्द करण्याचे धाडस मोदीजींनी दाखवले. तरीही आज त्यांच्यावर हे टीका करत आहेत, पण आगामी लोकसभेत हेच शिवसैनिक त्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असे यावेळी नमूद केले.यावेळी शिवसेना नेते खासदार प्रतापरावजी जाधव,आमदार श्री.संजय जी रायमूलकर,आमदार श्री.संजयजी गायकवाड,आमदार संजय सिरसाट,आमदार चंद्रकांत पाटील तसेच शिवसेनेचे सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधी,शिवसेना जिल्हाप्रमुख ,महिला आघाडी जिल्हाप्रमुख,युवासेना जिल्हाप्रमुख शिवसेना, युवासेना,महिला आघाडी व सर्व अंगीकृत संघटनांचे आजी-माजी शिवसेना युवासेना पदाधिकारी कार्यकर्ते शिवसैनिक महिला भगिनी हजारोंच्या संख्येने उपस्थित होत्या.

# न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक, प्राथमिक विद्यालया मध्ये बालचमुंचा आठवडी बाजारला उत्स्फूर्त प्रतिसाद

## बालचमूंचा आठवडी बाजार म्हणजे विद्यार्थ्यांच्या गणितीय व व्यवहारिक ज्ञानाचे मूल्यमापन होय-मा.विठ्ठलराव शिंदे

**सांगोला । प्रतिनिधी**

न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक प्राथमिक विद्यालय मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बालकांचा शालेय अंतर्गत आठवडी बाजार भरवण्यात आला.विद्यार्थ्यांच्या गणितीय आणि व्यवहार ज्ञानामध्ये भर घालणारा हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.या कार्यक्रमाचे उद्घाटन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले संस्थेचे सचिव मा. श्री. विठ्ठलरावजी शिंदे सर व प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या मराठी विभागाच्या प्रा. सौ.जयश्री पाटील मॅडम यांच्या शुभहस्ते करण्यात आले.याप्रसंगी संस्था सदस्य प्रा. डॉ. अशोकराव शिंदे , न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री दिनेश शिंदे सर,पर्यवेक्षक मा. श्री. पांचाळ सर, कार्यालयीन अधीक्षक मा. श्री .लक्ष्मणराव बेहरे सर, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मधील प्रा. देवेन लवटे सर, प्रा. श्रीराम सर, पूर्व प्राथमिक प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थी,पालक वर्ग, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व या बालचमूंच्या आठवडी बाजारातून खरेदी करण्यासाठी आलेले परिसरातील नागरिक मोठ्या





संख्येने उपस्थित होता.अध्यक्षीय भाषणामध्ये बोलताना संस्था सचिव मा. श्री. विठ्ठलरावजी शिंदे यांनी मुलांना मार्गदर्शन करताना असे सांगितले की, तुम्ही शाळेमध्ये ज्या गणितीय संकल्पनांचा अभ्यास केला, याचा व्यवहारीक जीवनामध्ये कसा उपयोग करावा, याचा प्रत्यक्ष अनुभव या आठवडी बाजारातून मिळणार आहे. बालचमूंचा आठवडी बाजार म्हणजे विद्यार्थ्यांच्या गणितीय व व्यवहारिक ज्ञानाचे मूल्यमापन होय.असे सांगितले.आठवडी बाजारामध्ये वस्तूंची देवाण-घेवाण करत असताना विद्यार्थ्यांकडून जर गणित चुकले, तर आर्थिक नुकसान होऊ शकते, यामुळे गणितीय कौशल्य व्यवहारामध्ये किती महत्त्वाचे आहे, हे सांगितले, व सर्व विद्यार्थ्यांना या आठवडी बाजार उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मधील मराठी विभागाच्या प्रा. सौ.जयश्री पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांना गोष्टीच्या स्वरूपामध्ये जगण्याचा मूलमंत्र समजावून सांगितला. त्याचबरोबर जीवनातील व्यवहार कौशल्य कसे वापरावे याचे अवलोकन या आठवडी बाजारातून करता येते असे सांगितले.या आठवणी बाजारासाठी परिसरातील सर्व नागरिक, न्यू इंग्लिश स्कूल संकुलातील सर्व शिक्षक व पालक यांनी या आठवणी बाजारातून विविध वस्तू व भाज्या खरेदी करून विद्यार्थ्यांच्या व्यवहारिक ज्ञानाचे मूल्यमापन केले, विद्यार्थ्यांच्या व मार्गदर्शक शिक्षकांच्याबद्दल गौरवोतगार काढले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. माधुरी जाधव मॅडम यांनी केले तर आभार श्री इमडे सर यांनी मानले.

# वाघमारे सरांच्या कराटे क्लासचे यश ब्लॅक बेल्ट गटात शिवांश होनराव व आवेश फारुकीचे यश

**सांगोला । प्रतिनिधी**

कराटेच्या कलर बेल्ट स्पर्धा परीक्षेमध्ये एकूण ४० मुलांचे यश शाओलीन वर्ल्ड मार्शल आर्ट शाखा सांगोला यांच्यामार्फत विद्यामंदिर इंग्लिश मीडियम येथे दिनांक १४ जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आलेल्या कलर बेल्ट परीक्षेमध्ये एकूण ४० मुलांनी यश संपादन केले केले परीक्षेमध्ये पंचेस ब्लॉक किक्स कथा कुमिते लाठीकाठी नॉनचाक् कता व कुमिते टेक्निक सेल्फ डिफेन्स इतर प्रशिक्षण देण्यात आले या परीक्षेला पंच म्हणून राष्ट्रीय पंच निजेंद्र चौधरी आशिष कोकरे मयंक स्वामी यांनी



काम पाहिले तर परीक्षा यशस्वी करण्यासाठी शुभिक्षा इंगोले शिवतेज इंगोले रोहित अरबळी संस्कार सूर्यवंशी सानवी भंडारे प्रताप करे विशाल घाडगे आदींनी काम पाहिले यशस्वी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्री सुनील वाघमारे सरांनी मार्गदर्शन केले.

# विकसित भारत संकल्प योजनेच्या चित्ररथाचे चोपडी येथे स्वागत

**सांगोला । प्रतिनिधी**

विकसित भारत संकल्प यात्रेचा चित्ररथ चोपडी गावामध्ये आला होता. या चित्ररथाचे स्वागत व उद्घाटन ग्रामपंचायत सदस्य दिनेश बाबर यांच्या हस्ते करण्यात आले . त्यानंतर चित्ररथातील व्हिडिओच्या माध्यमातून सर्वांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती दाखवण्यात आली. यामध्ये ग्रामपंचायत स्तरावरच्या शासनाच्या योजना, पशुसंवर्धन विभागाच्या शासनाच्या योजना ,बचत गटाच्या शासनाच्या योजना, आरोग्य विभागाच्या शासनाच्या योजना ,कृषी विभागाच्या शासनाच्या योजना तसेच शासनाच्या इतर विभागाच्या महत्त्वपूर्ण विविध



योजना याविषयी या विकसित भारत संकल्प रथातून व्हिडिओ चित्रफितीद्वारे माहिती देण्यात आली. यावेळी पशुधन विकास अधिकारी डॉक्टर चंद्रकांत धांडोरे यांनी शासनाच्या पशुधनाविषयी असणाऱ्या योजना याविषयी सविस्तर माहिती दिली.तसेच कृषी सहाय्यक एस.डी.गवळी यांनी शासनाच्या कृषी विषयक असणाऱ्या योजना विषयी माहिती दिली.तसेच ग्राम विकास अधिकारी मच्छिंद्र मिसाळ, यांनी ग्रामपंचायत स्तरावरच्या शासनाच्या विविध योजनांची माहिती देत सर्वांना शपथ दिली.या कार्यक्रमासाठी डॉ.ए.व्ही.कलाल, केंद्रप्रमुख पालक अधिकारी राजाराम पाटील, तलाठी जाधव ,सुपर वॉरियर अनिल चौगुले, जालिंदर मलमे, यांच्यासह रुद्राक्ष खांडेकर, बचत गटाच्या महिला अधिकारी व कर्मचारी, आशा वर्कर, सिस्टर, ग्रामपंचायतचे कर्मचारी, कृषी मित्र बाळासाहेब बाबर, यांच्यासह चोपडी - बंडगरवाडी गावातील मान्यवर ,शेतकरी बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अनाथांना महाराष्ट्रात कोणत्याही कोर्सला शैक्षणिक शुल्क भरावे लागणार नाही-चंद्रकांत पाटील

**पुणे**-अनाथांना महाराष्ट्रात एक टक्का आरक्षण सुरु आहे. यामुळे अनेक अनाथ मुलांना नोक-या मिळायला लागल्या. स्पर्धा परीक्षांची फी देखील कमी केली आहे. आता अनाथांना महाराष्ट्रात कोणत्याही कोर्सला शैक्षणिक शुल्क भरावे लागणार नाही. याचा निर्णय एक महिन्यापूर्वी झाला आहे. महिला बाल कल्याण विभागाकडे हे काम असून हा मोठा निर्णय झाला असल्याचे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.तर्पण फाउंडेशन तर्फे तर्पण युवा पुरस्कार प्रदान सोहळा कात्रज कोंढवा रस्त्यावरील इस्कॉन मंदिराच्या कमलनयन बजाज अतिथी गृहात पार पडला त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, तर्पण फाऊंडेशनचे संस्थापक आमदार श्रीकांत भारतीय, प्रकल्प संचालक ऊर्जा भारतीय, इस्कॉन पुणे चे उपाध्यक्ष रेवतीपती प्रभू, पुण्यातील संचालक संजय भोसले, अशोक गुंदेचा, जनार्दन चितोडे, राजेश मेहता, किशोर तळेकर, पुरुषोत्तम पाटील, शशिकांत जगदाळे, प्रविण पाटील, अनुप शहा आदी उपस्थित होते.अनाथ मुलांसाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांच्या कार्याचा गौरव तर्पण युवा पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या माध्यमातून दरवर्षी केला जातो. यावर्षी पुण्यातील विजय फळणीकर यांना 'आपलं घरं' संस्था, नाशिकमधील स्वामी नारायण मंदिराचे प.पू. माधव स्वामी



महाराज आणि अमरावतीमधील गुंजन गोळे यांच्या 'गोकुळाश्रम' संस्थेला यंदाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.चंद्रकांत पाटील म्हणाले, परमेश्वराने भेदभाव निर्माण केला नाही. मात्र, आपण जाती, पंथ, भाषा, उपासना पद्धती यावर भेदभाव निर्माण केला. हा समाज माझा आहे, दुस-याचे दु:ख आपले मानून तर्पण फ़ौउंडेशन सारख्या संस्था कार्यरत आहेत. हिंदू तत्वज्ञानात माणसाला कसे जगावे हे शिकविण्यात आले. माझ्या समाजाची काळजी मी करणे, हा धर्म आहे, हे स्वामी विवेकानंद यांनी शिकविले. हिंदवी स्वराज्य निर्माण करणा-या छत्रपती शिवाजी महाराजांचे मोठे योगदान आहे. त्यांना जिजामातांनी घडविले. त्यामुळे त्यांचे कार्य आपल्याला आदर्शवत आहे.डॉ.सुरेश गोसावी म्हणाले, बालसुधारगृहातून बाहेर पडल्यानंतर पुढे काय? असा प्रश्न मुलांसमोर असतो. त्यांना योग्य दिशा मिळाली तर त्यांचे आयुष्य चांगले घडू शकते. त्यांच्यासाठी काम करणारी ही संस्था आहे.श्रीकांत भारतीय म्हणाले, तर्पण फाउंडेशन हे १८ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या अनाथ मुलांसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर काम करते. फाउंडेशन मार्फत अनाथ मुलांच्या शिक्षणाबरोबरच नोकरी मिळविण्यासाठी सुद्धा मदत केली जाते. शिक्षण आणि नोकरी झाल्यानंतर मुलांचे विवाह जुळविणे आणि थाटात लग्न लावून देण्याचे कार्यसुद्धा फाउंडेशन करते.

# विवेकानंद महाविद्यालयात पदवीदान समारंभ संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनो आई-वडिलांनी तुमच्या सुखासाठी खस्ता खाल्ल्या. हालअपेष्टा सहन करीत तुम्हाला शिकविले. पोरांची प्रगती झाली पाहिजे यासाठी त्यांनी काबाडकष्ट केले आहे.उद्या मोठे झाल्यावर कृपया आपल्या आई-वडिलांच्या त्यागाला विसरू नका. त्यांचे कष्ट आणि तुमच्यावरील प्रेम कायम लक्षात ठेवा. आयुष्यात सज्जन माणूस बना आणि समाजाच्या कामी या असे विचार विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान यांनी व्यक्त केले. ते स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात पदवीदान समारंभात अध्यक्षीय भाषण करताना बोलत होते. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे गोंडवाना विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. सागर वझे, सामाजिक कार्यकर्ते प्रा. धनराज आस्वले, प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे, डॉ. विजय टोंगे, डॉ. जयवंत काकडे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मुख्य मार्गदर्शन करताना डॉ सागर वझे यांनी सांगितले की शिक्षण ही आजीवन चालणारी प्रक्रिया आहे. इथेच थांबू नका तर अभ्यासात सातत्य ठेवा. अलीकडे सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्याचा आयुष्यात सदुपयोग करून घ्या असे विचार या



मांडले. यावेळी प्रा. धनराज आस्वले यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यात संधीचे सोने करण्याचा सल्ला दिला. यावेळी विविध पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची प्रास्ताविक डॉ नामदेव उमाटे, संचालन डॉ. ज्योती राखुंडे आभारप्रदर्शन डॉ. गजानन खामनकर यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी पदवी प्राप्त करण्यासाठी प्रामुख्याने उपस्थित होते. यासोबतच गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक, वरिष्ठ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, महाविद्यालयातील वरिष्ठ कनिष्ठ विभागातील प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सोलापूर दौऱ्या दिवशी जिल्ह्यातील महादेव कोळी समाज अन्नपाणी त्याग करणार : गणेश अंकुशराव

**सोलापूर**-देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १७ जानेवारी रोजी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्या दिवशी जिल्ह्यातील आदिवासी महादेव कोळी जमातीचे समाज बांधव अन्नत्याग करणार आहेत असे महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी सांगितले आहे.आदिवासी क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या४५ ते ५० लाख महादेव कोळी जमातीचा जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्राचा प्रश्न गेली अनेक वर्ष रेंगाळला असून लोकशाही मार्गाने अनेक वेळा उपोषण मोर्चे आंदोलन करून सुद्धा राज्य शासनाने न्याय दिला नाही. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी १७ जानेवारीला सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून जेवढा वेळ नरेंद्र मोदी सोलापूर जिल्ह्यामध्ये थांबतील तेवढा वेळ महादेव कोळी जमातीचे लोक अन्नपाणी ग्रहण करणार नाहीत. असा निर्धार समाजाच्या झालेल्या बैठकीत केला आहे .असे महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी सांगितले आहे.१९५६ ला कारण नसताना षडयंत्ररचून कोळी जमातीला क्षेत्र बंधन लागू केले होते. ते क्षेत्रबंधन भारतीय संसदेने १९७६ ला उठवले.आहे. त्यामुळे आदिवासी क्षेत्राच्या बाहेरील आदिवासी महादेव कोळी समाज सवलतीस



पात्र झाला आहे. परंतु आज पर्यंत ह्या राज्य शासनाने व आदिवासी जमातीच्या २५ आमदार आणि चार खासदारांनी आदिवासी क्षेत्राच्या बाहेरील कोळी जमातीला जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र मिळू दिले नाही. त्यामुळे हा समाज खूप मागे राहिला असून लोकशाही मार्गाने आंदोलन करूनही न्याय मिळत नसल्याने या प्रश्नात देशाचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी लक्ष घालावे यासाठी सोलापूर जिल्ह्यात नरेंद्र मोदींचा दौरा होणार असून ज्या दिवशी ते सोलापूर जिल्ह्यात येतील तेव्हापासून ते जाईपर्यंत कोळी जमातीचे समाज बांधव अन्नपाणी ग्रहण करणार नाहीत असा निर्धार करण्यात आला आहे .त्यामुळे नरेंद्रभाई मोदी यांनी संसदेने १९७६ ला क्षेत्र बंधन उठवले आहे त्याची अंमलबजावणी राज्य शासनाने आजपर्यंत केलेली नाही त्यामुळे संसदेने केलेल्या कायद्याचे अपमान करणाऱ्या राज्य शासनावरती कठोर कारवाई करावी आदिवासीच्या लोकसंख्येवर निवडून जाणारे आदिवासी २५ आमदार व चार खासदार आदिवासी कोळी जमातीलाच सवलती पासून वंचित ठेवतात त्यामुळे यांना अपात्र करावे व कोळी जमातीच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रश्नाकडे लक्ष घालून महादेव कोळी जमातीला जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने देण्याचे आदेश द्यावेत व चंद्रभागेतील पात्रात जिथे आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरेना अटक केली होती त्या जागेवर राष्ट्रीय स्मारक व्हावे मंजूर होऊनही कामाला सुरुवात होत नाही ते काम त्वरित व्हावेअशी मागणी समाज बांधवांच्या वतीने आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे चौक पंढरपूर येथे घोषणाबाजी करून महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी मागणी केली आहे. यावेळी दादासाहेब करकमकर अशोक अधटराव पांडुरंग सावतराव सुरज कांबळे गुरू अंभगराव लालू संगीतराव संपत सर्जे बाळासाहेब अधटराव प्रकाश मगर राम भाऊ सुरवसे माऊली कोळी प्रशांत कांबळे. रोहन कांबळे ललया परचंडे सागर परचंडे संदिप कोरे पांडुरंग कांबळे भैया नेहतराव सोमनाथ अंभगराव ओंकार अधटराव दादा माने उदय पंरचंडे तसेच असंख्य आदिवासी महादेव कोळी बांधव उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .